


Given at the hands of Dr. Narendra Jadhav, Member, Planning Commission, New Delhi. Received by Bhavarlal H. Jain



## ।। मानपत्र ।।

आदरणीय राजमान्य राजश्री पद्मश्री
डॉ. भवरलालजी हिरालालजी जैन तथा आपल्या
सर्वांचे 'भाऊ',
अंबरातील ताऱ्यांची गणती करणे कठीण,
सागर जलाशयाचा ठाव घेणंही अशक्य...
अगदी तसचं आपल्या कर्तृत्वाचं वर्णन एका मानपत्रात शब्दांकीत करणेसुद्धा अवघड आहे, जगद्‌विख्यात भारतीय उद्योगपती एवढीच आपली ओळख नाही. शेती, माती, जलसंपत्ती, शेतकरी, निसर्गावर प्रचंड प्रेम करणारे, निसर्गाचे संवर्धन व जतन करणारे, शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रगती-समृद्धीसाठी जिवापाड प्रयत्न करणारे, जन्मभूमी-कर्मभूमीविषयी कृतिशील कृतज्ञता बाळगणारे एक असामान्य व्यक्तिमत्त्व या दृष्टीने आम्ही समस्त जळगावकर आपणास अपूर्व आनंदाने, कृतार्थतेने, सन्मानपूर्वक हे मानपत्र बहाल करीत आहोत.
जेव्हा विद्येला विनयाची, साधनेला सातत्याची, विचाराला आचाराची, श्रद्धेला बुद्धिची, सामर्थ्याला संयमाची, कर्तृत्वाला दातृत्त्वाची, समृद्धीला समाधानाची, सुखाला शांतीची, संकल्पाला सिद्धीची, सौंदर्याला शालिनतेची आणि प्रतिष्ठेला सेवेची साथ-संगत लाभते तेव्हाच भाऊ आपणासारखा कृतज्ञ 'भूमिपुत्र' घडतो.
अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेल्या जळगाव जिल्ह्यातील वाकोद येथे १२ डिसेंबर १९३७ ला आपला जन्म झाला. आई गौराबाई आणि वडील हिरालालजींच्या संस्कारशिदोरीचा आपल्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. तसे राजस्थानातील जोधपूर-आगोलाई हे आपल्या पूर्वजांचे मूळ खेडेगाव, परंतु ११५ वर्षांपासून आपल्या सहा पिढ्यांच नात वाकोदशी-जळगावशी म्हणजेचं महाराष्ट्राशी-मराठीशी जुळले ते कायमचेच! आपल्या समाजात रुजलेल्या 'सावकारी'च्या आडवळणाने जाण्यापेक्षा शेती उत्पादनांच्या खरेदी-विक्रीद्वारे आपल्या वाडवडिलांनी सचोटीच्या सरळ मार्गाने जाण्याची नैतिकता, साधनशूचिता, प्रामाणिकता अंगी बाळगली - तिच आपल्यातही घट्ट संस्कारित झाली.
आपले प्राथमिक शिक्षण वाकोदला व पुढे जळगाव नगरपालिकेच्याच शाळा नं. ३ मध्ये झाले. बी.कॉम. आणि एलएल.बी. या पदव्या आपण मुंबईत जावून घेतल्या. शिक्षण पूर्ण झाल्यावर आपण जळगावी परतलात. वकिलीत उमेदवारी सुरू केली. प्रखर आत्मविश्वास, तेजस्वी तर्कबुद्धी, अचूक निर्णय क्षमता लाभलेल्या आपणास शासनाच्या स्पर्धा परीक्षेत धवल यश प्राप्त झाले, राजपत्रीत अधिकारी म्हणून आपली नेमणूक झाली. यावेळी वकिली, नोकरी की आणखी काही या विचारात असतांना आपल्या सर्वांच्या हितासाठी झटणाऱ्या अशिक्षित आईने 'आपल्या कुटुंब, आसपासच्या माणसांबरोबरच पशु-पक्षी, किडा-मुंगी यांचीही पोट भरेल असे काही तरी करं.' असे मार्गदर्शन केले, त्यातूनच पुढे व्यवसायाचा मार्ग चोखाळत आपले आयुष्यच आपण या सर्वांना समर्पित केले.
तीन पिढ्यांचे संचित असलेल्या फक्त ७,०००/- रुपयांवर आपण व्यवसायाला प्रारंभ केला. रॉकेल-केरोसीन-क्रुड ऑईल एजन्सी घेऊन लोडगाडीद्वारे रॉकेल विक्री सुरू केली. नंतर आपण शेती व्यवसायाशी निगडीत बी-बियाणे, खते, किटकनाशके, ट्रॅक्टर, मोटरसायकल, पीव्हीसी पाईप आदी ६५ कंपन्यांच्या एजन्सीजद्वारे शेती व शेतकऱ्यांची सेवा सुरू केली. रॉकेलचे भाव बजेटनंतर एकदम आभाळाला भिडल्यानंतर अफाट नफा कमावण्याची संधी असतांनाही आपण जुन्याच भावाने ग्राहकांना रॉकेल विकले. अशा 'सचोटी'च्या भक्कम पायावर उभारलेली आपली व्यावसायिक नीतिमत्ता आज आपणाला विश्वविख्यात स्तरावर घेऊन गेली याचा आम्हाला विशेष अभिमान वाटतो. 'मोठा माणूस' बनण्यापेक्षाही 'चांगला माणूस' होण्यास आपण नेहमीच महत्त्व देत आलात. शिस्तबद्ध कार्यसंस्कृती आणि संस्कारप्रधान आचरण यातील 'समसमा संयोग' आपण साधला. आपल्या अनुभवांची ही शिदोरी अनेकांना दिशादर्शक ठरते.
भाऊ, आपला उद्योग जळगावात सुरू झाला, सजला, फुलला, विस्तारला, साहजिकच जळगावात पायाभूत सुविधांचा विकास त्यामुळे झाला. इतर साहाय्यभूत उद्योगांचा पाया त्यातून रचला गेला. जळगाव हीच कर्मभूमी मानून आपल्या व्यवसायाचा वटवृक्ष उभा करत शेती-शेतकरी यांच्याशी बांधिलकी राखत, पाण्याच्या व्यवस्थापनाचे तंत्र आत्मसात करून इतरांना त्याबाबतचे मार्गदर्शन उपलब्ध करून देत देत आपली वाटचाल जोमदारपणे सुरू झाली. आपण वाकोदच्या शेतीत त्यावेळी राबून त्यातील अडीअडचणींचा, कराव्या लागणाऱ्या सुधारणांचा अनुभवात्मक अभ्यास केला. कठोर परिश्रम, श्रमप्रतिष्ठा, सत्त्वशील जीवनव्यवहाराचा पाया रचला गेला तो याच काळात. कृषी संबंधित उद्योगांमध्ये पपेन, पीव्हीसी पाईप, ठिबक सिंचन, स्प्रिंकलर, फळप्रक्रिया, अपारंपारिक ऊर्जा आदी उत्पादनांची राष्ट्रीय पातळीवर नव्हे तर जागतिक पातळीवर कीर्ती आज पोहोचली असून नवनवीन क्षितीजे काबीज करणे अखंडपणे सुरूच आहे. आज जळगावातून १६२ पेक्षा अधिक देशांमध्ये आपल्या उत्पादनांची निर्यात होते. अवघ्या ४९ वर्षांच्या व्यावसायिक कारकिर्दीत आपण स्वकर्तृत्वावर ४००० कोटींपेक्षा अधिक उलाढालीचा पल्ला गाठला. इतर उद्योग व्यवसायांप्रमाणे केवळ नफ्यासाठी व्यवसाय हे उद्दिष्ट न ठेवता आपण शेती, शेतकऱ्यांच्या समृद्धीतून ग्रामीण विकास साधत पर्यावरण रक्षक व्यवसायांची मालिकाच उभारली. अशा आपल्या सामाजिक उद्योजकतेच्या प्रतिकृती जगभरात ठिकठिकाणी इतर लोक वा संस्थांद्वारे एखाद्या चळवळीच्या स्वरूपात उभारल्या जाव्यात, तेव्हाच साऱ्या मानवजातीच्या कल्याणासोबतच पर्यावरणाचेही संवर्धन होईल. या अनुषंगानेच अमेरिकेतील हावर्ड बिझनेस स्कूलने, आपल्या कार्याचा सखोल अभ्यास सुरू केला आहे. जळगावातील आपल्यासारख्या सन्माननीय नागरिकाच्या कार्याची अशी दखल एका जागतिक संस्थेने संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी विचारात घेणं ही आम्हा जळगाववासियांच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब ठरते.
'देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे। मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे।।
देखणी ती पावले जी ध्यासपंथे चालती। वाळवंटातूनसुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती।।'
आजचे जगप्रसिद्ध 'जैन हिल्स' म्हणजे तेव्हाचे एक बरड माळरान, ना पाणी ना सावली. पण आज आपण या संपूर्ण परिसराचाच कायापालट केला आहे. म्हणूनच जैन हिल्सला आज कुणी 'नंदनवन' म्हणते तर कुणी 'कृषिपंढरी', तर कुणी 'स्वर्गभूमी', 'तपोभूमी' आणि आपणाला 'भगिरथ', 'भूमिदूत', 'कर्मयोगी', 'तपस्वी', 'स्वप्नवेडा', 'किमयागार' अशा नानाविधं उपाधी बहाल करू लागले. 'कृषिस्तव ध्येयासाठी रात्रंदिन तो ध्यास जीवाला' या उक्तीप्रमाणे आपण जगलात, कण-कण झिजलात त्यातून हे अपार वैभव निर्माण झाले. 'सार्थक करू या जन्माचे, रुप पालटू वसुंधरेचे' हे आपले जीवन-लक्ष्यच झाले आहे!
भाऊ, सर्वांग सुंदर निर्मितीचे वरदान आपल्याला लाभलेले असून अत्यंत आव्हानात्मक प्रकल्प यशस्वी करून दाखविण्याची जबरदस्त जिद्द, चिकाटी आपल्या ठायी आहे. कठोर परिश्रम, पारदर्शकता, प्रामाणिकपणा ही जीवनमूल्ये आपल्या आयुष्याचा मुख्य पायाच आहेत. सद्‌सद्‌विवेकशीलता व चारित्र्यसंपन्नता, कृतज्ञता आणि विनम्रता याचे क्षणोक्षणी दर्शन आपल्या व्यक्तिमत्त्वातून होते. आपण पाण्याच्या थेंबाचे मोती करून, मातीतून मोती पिकवण्याचे तंत्र येथील बळीराजांच्या ठायी रुजवले. यामुळेच आपले नेतृत्व लाभलेली जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. ही कंपनी आजमितीस ठिबक आणि पाईपांच्या एकत्रित उत्पादनात, टिश्युकल्चर केळी रोपांच्या निर्मितीत आणि आंबा फळप्रक्रियेतही जगात प्रथम क्रमांकाची उत्पादक ठरली आहे. याशिवाय कांदा व भाजीपाला प्रक्रियेसाठी ती जगात तिसऱ्या स्थानी आहे. आपल्या मार्गदर्शनाखाली कृषिसंबंधीत आधुनिक तंत्रज्ञानाच्या संशोधन, विकास व प्रसारासाठी जगातील २४ हून अधिक कृषी विद्यापीठांसोबत आपल्या जैन इरिगेशनचे कार्य सुरू आहे. त्याकरिता जगाच्या आणि भारताच्या कानाकोपऱ्यातून अनेक उद्योजक, विद्वान, शास्त्रज्ञ, व्यापारी, शेतकरी, तंत्रज्ञ दरवर्षी हजारोंच्या संख्येने जळगावात येतात.
भाऊ, आपण सुरू केलेल्या उद्योजकीय भरारीतून देशात ११ तर विदेशांमध्ये १३ असे एकूण २४ कारखाने उभारले गेले. तरीही आपले मुख्य कार्यालय व जैन परिवाराचा रहिवास हा जळगावातच आहे. यातूनच जळगावकरांशी असलेला जिव्हाळ्याचा, प्रेमाचा, ममत्त्वाचा धागा कायमच घट्ट राहिला. जळगावातल्या दर चार घरांपैकी एकाचा आपल्या उद्योगाशी या-ना त्या नात्याने संबंध येतोच. इथल्या अर्थकारणावर, बाजारपेठेतील उलाढालीवर, पर्यायाने जळगावातील विकासावर आपल्या उद्योगाचा प्रभाव आहे.
निसर्गाने, शेती-मातीने, समाजाने, जन्मभूमी-कर्मभूमीने-खानदेशाने






आपल्याला जे दिले आहे, त्याची कृतज्ञतेने परतफेड करायलाच हवी ही भावना, आपल्यात सतत प्रज्वलित असते. सह्रदयता, करुणा आपल्यात ओतप्रोत भरली आहे. भवरलालजी अॅण्ड कांताबाई जैन मल्टिपर्पज फाऊंडेशनच्या (आधीचे जैन चॅरिटीज) माध्यमातून अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वाङ्‌मयीन, आध्यात्मिक, क्रीडा, आरोग्य क्षेत्रातले येथील अनेक उपक्रम केवळ आपल्या ऋणमोचनाच्या भावनेतून सतत सुरू आहेत. जळगाव शहर स्वच्छ, सुंदर, हिरवाईने नटलेले असावे या पोटी आपण शहरातील काव्यरत्नावली चौक, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा आदी स्थळं सुशोभित केली. खानदेशच्या सुप्रसिद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याच्या जतनासाठी, प्रचार-प्रसारासाठी आपण जळगावातच त्यांचे स्मारक उभारणी सुरू केली. आपण जळगावातच सुरू केलेल्या आंतरराष्ट्रीय स्तराच्या 'अनुभूति' स्कूलने अल्पावधीतच कीर्ती प्राप्त केली आहे. दारिद्र्य रेषेखालील नागरिकांच्या गुणी मुलांसाठी आपण जळगाव मनपाची एक शाळा कायम स्वरुपी आपल्या अधिपत्याखाली घेतली आहे. आपल्या याच फाऊंडेशनच्या जैन स्पोर्ट्स अॅकॅडमी मार्फत अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर येथील उद्योन्मुख खेळाडूंना स्थान प्राप्त करून देत, अनेक भव्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या समग्र कार्याची मौलिकता जपणारे, जगभरातल्या गांधी अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरेल असे विश्वस्तरीय 'गांधी रिसर्च फाऊंडेशन' ही याच जळगावात आपण नावारुपास आणत आहात, याद्वारे अहिंसा व शांततेच्या प्रसारासाठी जळगाव हे एक आधुनिक गांधीतीर्थच ठरेल.

भाऊ, 'ज्याच्या सोबत सुंदर विचार असतात, तो आयुष्याच्या प्रवासात कधीच एकटा नसतो.' आपल्या सहवासात असंख्य माणसे सुगंधित झाली. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, काव्य, कला, विज्ञान, व्यवस्थापन यातील आपले विचारदर्शन अनेकांना मार्गदर्शक ठरते आहे. इतिहास घडविणे, भूगोल बदलविणे त्यातून अर्थशास्त्राच्या घडामोडींसोबतच सांस्कृतिकताही जोपासणे आपल्या उद्योजकीय व्यक्तिमत्त्वाचा श्रेष्ठ भाग आहे. गुरूऋण मान्य करणारे आपण एक श्रेष्ठतम विद्यार्थी आहात. पुस्तकासारखे खुले आहात म्हणून स्वागतशील आहात. या लोकव्यवहारात आपले असंख्य स्नेहसंबंधी आहेत जे कायमचेच आपल्या भल्या मोठ्या विस्तारित परिवाराचे घटक आहेत. ज्येष्ठ विचारवंत, तत्त्वज्ञ ही आपली ख्याती. आपल्या निरीक्षण, चिंतन, मनन, कार्याच्या तपश्चर्येतून आता साहित्य निर्मितीही घडते आहे. 'आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी' या आपल्या पुस्तकातील सज्जनशक्तीचं दर्शन फार मोठ्या चर्चेचा विषय बनले. किंबहुना त्या पुस्तकातील स्त्रियांचा सत्तेतील सहभाग, लोकप्रतिनिधींना माघारी बोलवा, माहितीच्या अधिकाराचा सुयोग्य वापर - अशा आजच्या अनेक क्रांतीकारी पावलांची बीजे आपल्या या पुस्तकात आढळतात. आपण भूमिपुत्रांसाठी 'कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटाची' पुस्तक लिहिले. सहधर्मचारिणी स्व. कांताबाईंप्रति आपली असणारी विनम्र जाणीव आपल्या 'ती आणि मी' पुस्तकाद्वारे अनेक वाचकांना अंतर्मुख करते. आपल्या समर्पित सहजीवनाचं अनोखं दर्शन या साहित्यकृतीतून घडते. मराठी साहित्याला उद्योजकाच्या संवेदनशील मनाचे प्रांजळ दर्शन आपण घडविले. एका वर्षात या पुस्तकाच्या १२,००० प्रती वाचकांपर्यंत पोहोचल्या असून 'ती आणि मी'चे वाचन ही निकोप आणि प्रगल्भ समाजाची गरज होत आहे.

भाऊ, आपल्या कार्यसंस्कृतीला आदर्श मानणाऱ्या अनेक व्यक्ती आपापल्या क्षेत्रात यशस्वी होत आहेत, भविष्यातही होतील. आपल्या संयुक्त कुटुंबातील १५० सदस्यांसह, कंपनीतील सहकारी व वितरक असे १०००० हून अधिक सदस्य आपण दाखविलेल्या मार्गावर चालत आहेत. 'कर्म हेच जीवन' ही कार्यसंस्कृती मानणारे आपण तरुणांसाठी तर 'दीपस्तंभ'च आहात. आपले सुपुत्र अशोक, अनिल, अजित, अतुल याच कार्य संस्कृतीनुसार या समुहाची धुरा सांभाळत आहेत. तसेच आपण संस्कारित केलेली नातवंडे हा वारसा समर्थपणे पुढे नेतील याची खात्री आम्हा जळगावकरांना आहे.

भाऊ, आपल्या बहु आयामी कार्य-कर्तृत्वाबद्दल आपणाला आणि आपल्या नेतृत्वाखालील कंपन्यांना १९६ हून अधिक पुरस्कार-सन्मान प्राप्त झाले. आपला जितका जास्त गौरव होत गेला, तितके आपण 'जीवनाचे नम्र उपासक' झालात. भारतातील चार विद्यापीठांनी 'डॉक्टरेट' उपाधी आपणास दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर सिंचन क्षेत्रातील नोबेल पुरस्कार समजला जाणारा 'क्रॉफर्ड रिड मेमोरियल' पुरस्कार प्राप्त झालेले आपण एकमेव भारतीय आहात. 'भारताचा जलरक्षक', 'जगातील सर्वोत्तम ब्लू चिप कंपन्यांना आव्हान देणारे', आशियातील ४,००० कोटी रुपयांपर्यंतचा सर्वोत्तम २०० कंपन्यांमधील मानकरी, पृथ्वीवरील हरिततंत्र धारक १०० भविष्यवर्ती कंपन्या, क्लायन्ट लिडरशिप अॅवार्ड वानगीदाखल ही काही नावे! या सर्वांचे मूळ दडले आहे ते आपल्या मूल्याधिष्ठीत अंत:प्रेरणेत. 'जे जे कार्य करू त्यात कायम अग्रगण्यता राखू', हेच आपले ब्रीद आहे. समस्त जळगावकरांसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब म्हणजे आपणास भारत सरकारद्वारा मा. राष्ट्रपतींनी दिलेला 'पद्मश्री' सन्मान! जळगाव जिल्ह्याला भाऊ आपल्यामुळे पहिल्या 'पद्मश्री'चा मान मिळाला आणि आम्हा समस्त जळगावाकरांची मान उंचावली!

भाऊ, आपण पुढील वर्षी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहात आणि जैन इरिगेशन कंपनीचे पुढील वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. आपल्या कार्यतत्पर वाटचालीचे आम्ही साक्षीदार आहोत, याचे नितांत सार्थकत्व आम्ही अनुभवत आहोत.

भाऊ, आपणास उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य लाभो ही प्रभुचरणी प्रार्थना. समस्त जळगावकरांना आपल्या जैन परिवाराकडून असाच प्रेमाचा हक्क लाभत राहो. आपल्या प्रेरणेने आणि सहकार्याने पिढ्यानपिढ्या खानदेशची प्रगती होवो हीच ईश्वरचरणी आम्ही मागणी करतो. समस्त जळगावकरांच्यावतीने जगाच्या नकाशावर जळगावनगरीचे नाव कोरणारे शिल्पकार, थोर उद्योगमहर्षी आणि ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री डॉ. भवरलालजी हिरालालजी जैन उर्फ आदरणीय भाऊ आपणास 'जळगाव रत्न' म्हणून भूषवितांना आम्ही कृतकृत्यतेचा अनुभव घेत आहोत.

हे मानपत्र आपणास भारतीय नियोजन मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली, सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आणि कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल व कविवर्य पद्मश्री ना.धों. महानोर यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच आ. सुरेशदादा जैन, विरोधी पक्ष नेते ना. एकनाथरावजी खडसे, पालकमंत्री ना. गुलाबरावजी देवकर, खासदार हरिभाऊ जावळे, खासदार ए.टी. नाना पाटील, खासदार ईश्वरलालजी जैन, जिल्हा परिषद अध्यक्षा ना. सौ. स्मिता वाघ, आ. अरुणभाई गुजराथी, आ. गिरीशजी महाजन, आ. चिमणरावआबा पाटील, आ. राजूदादा देशमुख, आ. जगदीशजी वळवी, आ. संजयजी सावकारे, आ. शिरीषजी चौधरी, आ. साहेबरावजी पाटील, आ. दिलीपराव सोनवणे, आ. मनीषजी जैन, स्वातंत्र्य सैनिक काकासाहेब लेले, जिल्हाधिकारी निरंजन कुमार सुधांशू, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. निरूपमा डांगे, पोलीस अधिक्षक चंद्रकांतजी कुंभार, डॉ. अविनाशजी आचार्य, अॅड. अच्युतराव अत्रे, माजी खासदार उल्हासराव पाटील, माजी खासदार वसंतरावजी मोरे, माजी आ. शरद वाणी, माजी आ. सतीष अण्णा पाटील, माजी आ. जयप्रकाशजी बाविस्कर, माजी आ. गुरुमुख जगवाणी, माजी आ. सौ. मधुभाभी जैन आदी मान्यवरांच्या सन्माननीय उपस्थितीत बहाल करण्यात येत आहे. कृपया आपण याचा स्वीकार करावा ही नम्र विनंती.

आपले

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्रकाश बोखड** | **गणेश सोनवणे** | **सौ.भारती जाधव** | **रमेशदादा जैन** | **सौ.भारती सोनवणे** | **प्रदीप रायसोनी** |
| आयुक्त | विरोधी पक्ष नेते | महिला व बालकल्याण समिती सभापती | स्थायी समिती सभापती | उपमहापौर | महापौर |

**सर्व सन्माननीय नगरसेवक व समस्त जळगाव नगरवासीय**

**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**

शनिवार, १९ मार्च, २०११, फाल्गुन शुद्ध पौर्णिमा    बालगंधर्व खुले नाट्यगृह, जळगाव.

# Jalgaon Ratna – 2011









"Overall contribution to the upliftment of society in general and the farming community in particular"

*Instituted by Jalgaon Municipal Corporation, Jalgaon, Maharashtra*


जगाच्या नकाशावर जळगाव नगरीचे नाव
कोरणारे शिल्पकार, थोर उद्योगमहर्षी आणि
ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन
नागरी सत्कार सोहळा


जगाच्या नकाशावर जळगाव नगरीचे नाव
कोरणारे शिल्पकार, थोर उद्योगमहर्षी आणि
ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन
नागरी सत्कार सोहळा


जगाच्या नकाशावर जळगाव नगरीचे नाव
कोरणारे शिल्पकार, थोर उद्योगमहर्षी आणि
ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन
नागरी सत्कार सोहळा


जगाच्या नकाशावर जळगाव नगरीचे नाव
कोरणारे शिल्पकार, थोर उद्योगमहर्षी आणि
ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन
नागरी सत्कार सोहळा